## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम; महिलांना मिळणार किचन गार्डन कीट

# भाजपा राबविणार देवाभाऊ कृषी माऊली सोहळा

**समाचार/नगर-दि.२१**

नगर शहर जिल्हा महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्रांतिकारी महिला शेतकरी बिल' आणले. या ऐतिहासिक धोरणात्मक निर्णयावरून प्रेरणा घेऊन आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शहरी भागातील महिलांना गृह–कृषी क्षेत्रात आत्मनिर्भर करणारा एक नाविन्यपूर्ण प्रयोग आता प्रत्यक्षात साकारत आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत शहरी जिल्ह्यातील ४,000 महिलांना घरच्या घरी विषमुक्त शेती करण्यासाठी 'किचन गार्डन किट'चे मोफत वाटप करण्यात येणार आहे. महिला शक्तीच्या कल्पकतेला मानाचा मुजरा देणारा हा प्रयोग शहरात एक नवी सेंद्रिय क्रांती घडवेल. प्रमुख वैशिष्ट्ये व उपक्रमः तज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन सत्रः शहरी भागातील मर्यादित जागेत (उदा. बाल्कनी, गच्ची) उत्तम प्रकारे भाजीपाला कसा पिकवावा, यासाठी सोहळ्यात नामांकित नर्सरीचे तज्ञ, हायड्रोपोनिक्स कन्सल्टंट आणि कृषी विभागाच्या शहरी विभागातील अधिकाऱ्यांमार्फत महिलांना आधुनिक गृह–कृषीचे सखोल मार्गदर्शन केले जाईल.

आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रा अतर्गत शहरी जिल्ह्यातील ४,000 महिलांना घरच्या घरी विषमुक्त शेती करण्यासाठी किचन गार्डन किट चे मोफत वाटप करण्यात येणार आहे. महिला शक्तीच्या कल्पकतेला मानाचा मुजर देणारा हा प्रयोग शहरात एक नवी सैंद्रिय क्रांती घडवेल, प्रमुख वैशिष्ट्ये व उपक्रम. तजंचे विशेष मार्गदर्शन सत्रः शहरी भागतीन मर्यादित जागेत (उदा. बाल्कनी, गच्ची) उत्तम प्रकारे भाजीपाला कसा पिकताता, यासाठी सोहळ्यात नामांकित नर्सरीचे तज्ज्ञ, हायड्रोपोनिक्स कन्सल्टंट आणि कृषी विभागाच्या शहरी विभागातील अधिकान्यांमार्फत महिलांना आधुनिक गृह–कृषीचे सखोल नार्गदर्शन केले जाईल. किचन गर्डन' किट वाटपः महिलांना एका पर्यावरणप्रक आणि आकर्षक कापडी पिशवीतून १ प्रकारच्या भाज्यांची उच्च दर्जाची हायब्रीड बियाणे, सेंद्रिय खताचचे छोटी पिशवी आणि पाण्याचे छोटे स्प्रेअर । कारंजे) दिले जाणार आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित साकारत असलेल्या या भव्य सोहळ्याला परिसरातील सर्व महिला भगिनो मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत अशी माहीती भाजप महिला मोर्चाच्या वतीने देण्यात आलेली आहे माध्यम संपर्कासाठी: ९८५०५६९–९६ नाव/नदः संयोजकाचे नाव गीता गिल्डा प्रदेश सचिव भाजपा महिला मोर्चा अहिल्यानगर जिल्हाप्रमुख अहिल्या नगर शहर महिला मोची प्रिया जानवे. ठिकाण, केडगाव भिंगार सावेडी तीन ठिकाणी कार्यक्रम होणार मोबाईल नंबरः । ९८५०५६९१९५.



# वंचित घटकातील मुलांना 'स्नेहबंध'तर्फे शर्टचे वाटप

**समाचार/नगर-दि.२१**

सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने, स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने सावेडी परिसरातील झोपडपट्टीतील गरीब व गरजू मुलांसाठी शर्ट वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी इंजिनियर अभिजीत ढाकणे, मिलिंद कानडे, आयुष लालबोन्द्रे, स्वयंम बास्कर आणि प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परिसरातील लहान मुलांना नव्या शर्टचे वितरण करण्यात आले. नवीन शर्ट हाती पडताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि हसू उमटल्याचे पाहायला मिळाले. डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, समाजातील प्रत्येक मुलाला सन्मानाने जगण्याचा आणि शिक्षण घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. केवळ भौतिक मदत करणे हा यामागचा उद्देश नसून, गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे आणि त्यांच्या मनात 'आपणही समाजाचे भाग आहोत' हा आत्मविश्वास निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

# सुनीता लोंढे यांची संशोधनातून मानाची झेप

**समाचार/नगर-दि.२१**

अनुकूल कम्प्युटरच्या संचालिका सुनीता मुकुंद लोंढे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी जाहीर झाली असून, त्याबाबतचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे.

लोंढे यांनी अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली 'गुलबर्गा (कर्नाटक) येथील अनुबंध नियतकालिकातील कथांचा विवेचक अभ्यास' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनातून त्यांनी अनुबंध नियतकालिकातील कथांमधील आशयसूत्रे, साहित्यिक वैशिष्ट्ये आणि सामाजिक संदर्भांचा चिकित्सक व सखोल अभ्यास केला आहे.



मराठी साहित्य संशोधन क्षेत्रातील या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. सुनीता लोंढे या अनुकूल कम्प्युटरच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून संगणक शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षणाबरोबरच संशोधन क्षेत्रातही त्यांनी केलेली ही उल्लेखनीय कामगिरी संस्थेच्या कार्याला नवी उंची देणारी ठरली आहे.

## चरणसेवा, अन्नदान आणि सेवाभावाचा वारकऱ्यांना दिलासा

# संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे स्वागत

**समाचार/नगर-दि.२१**

खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व 'आपला मावळा' सामाजिक संस्थेच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील परीते येथे पंढरीच्या वारकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या अन्नछत्र उपक्रमाला सोमवारी दुसऱ्या दिवशीही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अन्नदानासोबत बाटलीबंद पाणी, गरमागरम वडा–पाव, वाफाळलेला चहा तसेच 'चरणसेवा' या आरोग्य उपक्रमाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला. उपक्रमातील नियोजन, आत्मीयता आणि सेवाभाव पाहून वारकऱ्यांनी खा. नीलेश लंके यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.



आषाढीनिमित्त टेंभुर्णी ते पंढरपूर मार्गावर परिते येथे आपला मावळा संघटना आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने वारकऱ्यांसाठी रविवारपासून तीन दिवस हा उपक्रम राबविण्यात येत आहे. रविवारी आणि कालच्या दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच अन्नछत्र परिसरात वारकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पंढरीच्या दिशेने निघालेल्या दिंड्यांमधील वारकऱ्यांनी काहीवेळ येथे विश्रांती घेत गरमागरम वडा–पाव, चहा आणि पिण्याच्या पाण्याचा लाभ घेतला. लांबच्या प्रवासामुळे थकलेल्या भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली 'चरणसेवा' महत्वाची ठरली.

या सेवेचा लाभ घेतलेल्या वारकऱ्यांनी खा. नीलेश लंके यांनी केवळ अन्नदान न करता वारकऱ्यांच्या आरोग्याचाही विचार केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

दरम्यान, पारनेर तालुक्याचे संत म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे सोमवारी दुपारी परीते येथील अन्नछत्राजवळ आगमन झाले. यावेळी खा. नीलेश लंके यांनी पालखी सोहळ्याचे उत्स्फूर्त स्वागत केले. सोहळ्याचे प्रमुख अशोक सावंत यांचा सत्कार करण्यात आला. बोलताना सावंत यांनी खा. लंके यांच्या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले.

## संभाजी ब्रिगेडकडून चौकशी मागणी

# एमआयडीसीतील भूखंडाचे नियम डावलून १५ जणांना वाटप- परकाळे

**समाचार/नगर-दि.२१**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अहिल्यानगर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी शासकीय दुध डेअरीचा ५०,६२५ चौ.मी.चा भूखंड क्र. बी–१०/२ नियमबाह्य पद्धतीने उपविभाजित संगनमताने १५ जणांना वाटप केल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी केला आहे.

परकाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी मुंबई यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सन १९८० मध्ये दुध डेअरीसाठी मंजूर झालेला अखंड भूखंड महामंडळाने परत ताब्यात घेतला. त्यानंतर अवघ्या ४६ दिवसांत फेब्रुवारी २०२४ मधील नवीन अर्जांद्वारे १५ जणांना भूखंड वाटप करण्यात आले.



यामध्ये नियमांचे उल्लंघन करण्यात आले असून, परिपत्रक क्र. बी–८६२५१ दि. २५/०६/२०१४ आणि १९७५ नुसार मोठ्या भूखंडाचे उपविभाजन करण्यापूर्वी पार्ट लेआऊट मंजुरी, नाशिक उपसंचालक व मुख्यालयाच्या नियोजन विभागाची मान्यता आवश्यक आहे. भूमापकांनीही दि. २/२/२०२६ रोजी तसा अभिप्राय दिला होता. मात्र मान्यता नसतानाही दि. ५/२/२०२४ रोजी प्रस्ताव पाठवून दि. १५/३/२०२४ रोजी थेट ऑफर लेटर देण्यात आले. एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ४४ नुसार रेखांकन मंजुरीशिवाय वाटप करणे अवैध आहे. याठिकाणी एमआरटीपी ॲक्टचे उल्लंघन करण्यात आले आहे. सन २०२० पासून उद्योग विस्तारासाठीचे पाच प्रलंबित अर्ज डावलून फस्ट कम फस्ट सर्व्ह तत्व मोडून नवीन अर्जदारांना प्राधान्य दिले.

ऑनलाईन पोर्टल जाणूनबुजून बंद ठेवून रात्री उशिरा सुरू करून संगनमताने अर्ज भरले असून पारदर्शकपणे कामकाज केलेले नाही. तसेच सदर भूखंडावरील १000 पेक्षा जास्त जुनी झाडे, साग–चंदनासह मौल्यवान झाडांची नोंद न घेता केवळ २४५ झाडे दाखवून खोटा पंचनामा करण्यात आला. खोट्या पंचनाम्या आधारे वृक्ष तोडीबाबत परवानगी दिली आहे. . याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे औद्योगिक विभाग अध्यक्ष अरविंद गेरांगे, तालुकाध्यक्ष महेश दानवे, शहर कार्याध्यक्ष अवि मेढे, शरद गेरांगे, भिमजी कोकाटे, दीपक कांबळे, आकाश मेढे, रमेश पवार, आदित्य खंडागळे, प्रसाद पांढुरे, सूरज धांडे, गौतम डोंगरे, अमोल चोथे, सचिन जऱ्हाड, सचिन गवळी उपस्थित होते.

# सारसनगर भागात सापडलेले अजगर निसर्गात मुक्त

**समाचार/नगर-दि.२१**

सारस नगर भागात गेल्या तीन चार दिवसात विविध भागात अजगराची तीन पिले अढळुन आली. ही पिले पुनम मोती नगर तसेच मेहेत्रे केटरर्स जवळील परिसरात दिसल्याचे तेथील नागरिकांनी माहिती दिली. सर्पमित्र युसूफ खान यांनी एक पिलू पकडुन ते मानद वन्य जीव रक्षक मंदार साबळे यांच्याकडे दिले.

साबळे यांनी वन विभागात माहिती देत त्यास वनपाल विजय चेमटे,वनमजूर शिंदे यांच्या समवेत संरक्षित वन क्षेत्रात मुक्त केले. शहराच्या आसपास पुर्वी अजगर नव्हते त्यांचा वावर विळद घाट, देहरे ते मुळा डॅम परिसरातील खडकाळ माळराना इतकाच मर्यादित होता. आता ते भुईकोट किल्ला परिसरात अनेकदा आढळून आले आहे तसेच साबळे यांनी सावेडीतील कोहिनुर मंगल कार्यालयाच्या



मागील बाजूस एकदा अजगराचे मृत पिलू सापडल्याची नोंद केलेली आहे. सारस नगर भागात हा साप दिसण्याची ही पहिलीच वेळ आहे अशी माहिती त्यांनी दिली.

अजगर बिनविषारी साप असला तरी तो अंगाने जाड असतो तसेच १५ फुटांपर्यंत वाढतो. यामुळे त्याला पाहुन भीती वाटण्याची शक्यता असते.सर्पमित्रांना जर हा साप शहर परिसरात अढळला व पकडला तर त्यास वनविभागामार्फत दुर संरक्षित वन क्षेत्रातच मुक्त करावा इतरत्र कोठेही मुक्त करू नये असे त्यांनी सांगितले. प्रत्येक सापांचा अधिवास हा वेगवेगळा असतो.त्यांना त्यांच्याच अधिवासात पुन्हा मुक्त करणे गरजेचे असते. जंगली भागात राहणारे चापडा, हरणटोळ असे सापही पुर्वी अपघाताने शहर परिसरात आढळून आले आहेत.निसर्गरचने नुसार वेगवेगळ्या अधिवासात राहणाऱ्या सापांच्या सवयी त्या त्या परिसराशी मिळत्या जुळत्या असतात असेही ते म्हणाले.

अजगर सापाच्या खाद्यात उंदीर,घुशी,ससे, हरीण आणि लहान सस्तन प्राण्यांचा समावेश असतो.भक्षाला पकडताच तो घट्ट विळखा घालून आवळून मारतो व नंतर गिळंकृत करतो.अजगर हा अन्न साखळीतील एक महत्वाचा घटक आहे. तो परिसरातील किंवा जंगलातील परिसंस्था संतुलित ठेवण्यास मदत करतो.या सापाची मादी एकावेळी ७० ते १०० अंडी घालु शकते असेही त्यांनी सांगितले.

# दिव्यांग सशक्तीकरण पुरस्कारासाठी अर्जाचे आवाहन

**समाचार/नगर-दि.२१**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागामार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या सन २०२६ च्या दिव्यांग सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज व नामांकने मागविण्यात आली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. या पुरस्कारांसाठी पात्र दिव्यांग व्यक्ती, संस्था, स्वयंसेवी संस्था, नियोक्ते व कर्मचाऱ्यांनी मुदतीत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे दिव्यांग सक्षमीकरण सहाय्यक आयुक्त देविदास कोकाटे यांनी केल आहे. या पुरस्कारांसाठी अर्ज स्वीकारण्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल १५ मे २०२६ पासून खुले करण्यात आले आहे. अर्ज व नामांकने https://awards.gov.in या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीनेच सादर

करावीत. प्रत्यक्ष किंवा इतर कोणत्याही माध्यमातून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.नामांकन करताना पोर्टलवरील विहित नमुन्यात सर्व आवश्यक तपशील भरणे बंधनकारक आहे. अर्जामध्ये संबंधित व्यक्ती अथवा संस्थेची उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी स्पष्टपणे नमूद करावी. तसेच त्या कामगिरीशी संबंधित आवश्यक समर्थनार्थ कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन, श्रेष्ठ दिव्यांगजन व श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक किंवा बालिका या उपश्रेणींसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी युडीआयडी (UDID) कार्ड किंवा दिव्यांगत्व प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे. पुरस्कारांसाठीचे पात्रतेचे निकष, अर्ज प्रक्रिया व इतर सविस्तर माहिती दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाच्या संकेतस्थळावर https://depwd.gov.in तसेच राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल https://awards.gov.in येथे उपलब्ध असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये देण्यात आली आहे. पात्र व्यक्ती व संस्थांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'समर्थ'मध्ये 'आनंददायी शनिवार, दप्तरमुक्त शनिवार' उपक्रम

**समाचार/नगर-दि.२१**

श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळा, सांगळे गल्ली विभाग येथे 'आनंददायी शनिवार – दप्तरमुक्त शनिवार' हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.ग्रुप हेड माय एफएम व दिव्य भास्कर ग्रूप हेड प्रियांका चिखले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी संवाद साधण्यात आला. शिक्षणाबरोबरच संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक विचार आणि जीवनातील यशाचा मंत्र विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून मिळाला. जीवनात आलेले संघर्ष, त्यावर मात करण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि सातत्य यामुळेच यश मिळाले, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचा सल्ला दिला.



श्रीपाद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सामान्य कुटुंबातील मुलांनीही जागतिक स्तरावर यश मिळविल्याची अनेक उदाहरणे सांगितली. त्यांनी एका सामान्य घरातील विद्यार्थ्याने तयार केलेल्या अत्याधुनिक रोबोटचा उल्लेख करून, मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आर्थिक परिस्थिती अडथळा ठरत नाही, तर जिद्द, चिकाटी आणि मेहनत यांची आवश्यकता असते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम याकडेही लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन यांनी शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन लीना बंगाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय वैशाली मगर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अजय महाजन यांनी केले, तर आभार सतीश मेढे यांनी मानले.

'आनंददायी शनिवार – दप्तरमुक्त शनिवार' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या चौकटीबाहेर जाऊन प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली. जीवनात यश मिळविण्यासाठी सकारात्मक विचार, मेहनत, सातत्य, चांगले संस्कार आणि आई–वडिलांचा सन्मान या मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभावीपणे बिंबविणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.